# नोंदणी झालेल्या दस्तविषयक अभिलेख दुरुस्तीस परवानगी देणे
## Correction in Records of Registered Documents
### प्रक्रीया (Process)

## अ. पक्षकाराकडून करावयाची प्रक्रीया -

1. चूक दुरुस्त होणेकरीता दुय्यम निबंधकाकडे अर्ज दाखल करणे
2. अर्जास रुपये 5/- चा चिकट न्यायालयीन मुद्रांक (कोर्ट फी लेबल)चिकटविणे
3. अर्जासोबत दस्ताची व सूचीची प्रत जोडणे

## ब. दुय्यम निबंधक कार्यालयाकडून करावयाची प्रक्रीया -

1. असा अर्ज प्राप्त झालेनंतर किंवा अन्य कारणाने त्यांचे निदर्शनास आल्यावर, त्यांचे कार्यालयीन अभिलेखाची तपासणी करणे
2. दुरुस्तीची आवश्यकता दिसून आल्यास, तशी चूक दुरुस्ती करण्यास मान्यता मिळणेकरीता सह जिल्हा निबंधक यांच्या मार्फत जिल्हा निबंधक तथा जिल्हाधिकारी यांना शिफारस करणे
3. चूक दुरुस्ती करणेचे मंजुरी मिळाल्यास, सूचीच्या मूळ अभिलेखात उक्त आदेशाची नोंद घेउन आदेशित केलेप्रमाणे दुरुस्ती करणे
4. दुरुस्ती झालेनंतर अर्जदारास सुधारीत अभिलेखाची प्रमाणित नक्कल मागणी केल्यास देणे.

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी दस्त नोंदणी इतर काही महत्वाच्या बाबी सूचीमधील दुरुस्ती पहावे.